# प्रकरण चौथे

## आधुनिक कालखंड

इतिहासाचे प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक असे तीन कालखंड पाडले जातात. भारताच्या इतिहासात आधुनिक काळाच्या प्रारंभासंबंधी मतभेद असलेले दिसून येतात. सर्वसाधारणपणे सतराव्या शतकापासून आधुनिक युग सुरू झाले, असे समजले जाते.ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना इ.स.१६०० ला झाली.तेव्हापासून आधुनिक युगाला सुरूवात झाली असे एक मत आहे.तर काहींच्या मते इ.स.१८१८ पासून आधुनिक काळाला सुरूवात झाली. महाराष्ट्राच्या इतिहासात मराठेशाहीचा ऱ्हास झाला आणि ब्रिटीशांचा अंमल सुरू झाला तेव्हापासून विविध क्षेत्रात नव्या युगाची वाटचाल सुरू झाल्याचे दिसून येते.

इंग्रजांच्या प्रगत पाश्चात्य संस्कृतीमुळे महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलू लागला. त्यामुळे १८१८ हे साल भारताच्या दृष्टीने व विशेषत: महाराष्ट्रासाठी महत्वपूर्ण ठरले. इंग्रजामुळे मराठी माणसांचा संपर्क पाश्चात्य विद्या, कला व शास्त्र यांच्याशी आला. नव्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक विचारांची ओळख मराठी माणसाला झाली. हा बदल निश्चितच क्रांतिकारक होता. जुन्या बुरसटलेल्या भारतीय समाजावर नवीन विचारांचे चौफेर हल्ले होवू लागले. या आव्हानाला तोंड देण्याची जबाबदारी एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीस मराठी समाजावर झाली. त्याला मराठी माणसाने प्रत्युत्तरही तेवढेच समर्थपणे दिले. या प्रक्रियेमधून आधुनिक महाराष्ट्राचा पाया घातला गेला.

इंग्रजांची राजवट सुरू झाली तेव्हापासूनचा कालखंड हा आधुनिक कालखंड मानला जातो. कारण भारताच्या भौतिक आधुनिकीकरणाला सुरूवात इंग्रजांनीच केली होती. तमोयुगातील निद्रिस्त भारतास जाग आणण्याचे काम ब्रिटीशांनीच केले असे म्हणावयास हरकत नाही. कारण त्यांच्या

गुलामगिरीतून भारतीयांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, शास्त्रीय ज्ञान याची माहिती मिळाली. तसेच वैचारिक आधुनिकतेसाठी ब्रिटीश राज्यकर्त्यांनी पाश्चात्य शिक्षणाची सुरूवात करून दिली व आधुनिकतेला प्रारंभ झाला.

विद्यांचे पुनरूज्जीवन, धर्मसुधारणा आणि नवीन जगाचा शोध या तीन घटनांनी मध्ययुगातून आधनिक काळातील संक्रमण साजरे झाले. प्राचीन विद्यांच्या पुनरूज्जीवनाने कला आणि साहित्य यांतील सर्जनशीलता, मानवतावाद, बुध्दिवाद, नवीन शोध यांना आधुनिक युगात चालना मिळाली. म्हणूनच आधुनिक काळ हा भारताच्या इतिहासात अत्यंत महत्वाचा काळ आहे.

काहींच्या मते, इ.स.१८५७ ते १९४७ ही आधुनिक कालखंडाची कालमर्यादा होय. १८५७ ला बंड झाले आणि त्यानंतर आधुनिक काळाला सुरूवात झाली अशी त्यांची धारणा होती. तर काहींच्या मते, भारतातील आधुनिक युगाला सुरूवात झाली ती राजा राममोहन रॉय यांच्यापासून. कारण त्यांनी सर्वप्रथम बुध्दिवादाचा पुरस्कार केला.

सेतुमाधवराव पगडींनी मामलेदाराच्या जागेपासून गृहसचिव आणि शिक्षण सचिवाच्या पदापर्यंत निरनिराळ्या पदावर काम केले. लाभलेल्या प्रत्येक संधीचा त्यांनी सदुपयोगच करून घेतल्याचे दिसते. स्वातंत्र्याच्या चळवळींचा इतिहास लिहिण्यासाठी नेमण्यात आलेल्या स्थानिक समितीचे ते समन्वयक असल्याने सरकारी दप्तरखान्यातील अस्सल कागदपत्र पाहून सुसंगत इतिहास लिहिण्याचे काम त्यांना सहजरीतीने करता आले.

पगडींनी अनेक फारसी ग्रंथांचे अनुवाद करून आधुनिक कालासंबंधीसुध्दा लेखन केले आहे. ते अनेक भाषांचे पंडित असल्यामुळे त्यांनी

इतिहासातील बारीक-सारीक तपशील तपासून पाहिला. त्यांना नोकरीनिमित्त अनेक ठिकाणी फिरावे लागले. नोकरी सांभाळतच त्यांनी तेथील भाषा, इतिहास यांचे ज्ञान घेण्यास सुरूवात केली.

हैदराबादेतील स्वातंत्र्याच्या चळवळीच्या इतिहासात इ.स.१८००-१९१० या अकरा दशकांत हैदराबाद राज्यांत निरनिराळ्या ठिकाणी झालेल्या स्वातंत्र्य संपादनाच्या प्रयत्नांचा वृत्तांत संक्षिप्तपणे देण्याचा प्रयत्न सेतुमाधवरावांनी केला. १८५७ चे क्रांती युध्द, वासुदेव बळवंताची उठावणी, चाफेकर बंधूचे क्रांतीकार्य आणि कान्हेरे प्रकरण या घटना भारतीय स्वातंत्र्य युध्दांत महत्वाच्या आहेत. त्या घटनांचे पडसाद आणि धागेदोरे हैदराबाद राज्यात कसे आढळतात, याचे अतिशय नाविन्यपूर्ण विवेचन करण्याचे काम पगडींनी केले आहे.

## इ.स.१८०० मधील महाराष्ट्र

इ.स.१८०० मध्ये महाराष्ट्राची विभागणी विविध सत्तांच्यात खालील प्रमाणे झालेली होती.

| | | |
|---|---|---|
| मराठे | - | सुमारे ऐंशी हजार चौरस मैल, |
| निजाम | - | सुमारे अडतीस हजार चौरस मैल, |
| इंग्रज आणि पोर्तुगीज | - | सुमारे दोन हजार चौरस मैल.[१] |

इ.स.१८०० पर्यंत मराठ्यांनी दोन तृतीयांश महाराष्ट्र आपल्या अंमलाखाली आणला होता. अर्थात तोपर्यंत त्यांनी गुजरात, माळवा,

बुंदेलखंड, ओरिसा, आग्रा, अजमेर, उत्तर कर्नाटक इत्यादी भारताचा निम्म्याहून अधिक भाग मोगल अंमलाखालून सोडविला होता. इंग्रज मध्ये आले नसते तर महाराष्ट्राचा उरलेला एक तृतीयांश भाग सुध्दा त्यांनी सोडवून मराठी अंमलाखाली आणला असता.[२]

१२ ऑक्टोबर, १८०० रोजी निजाम आणि ईस्ट इंडिया कंपनी यांच्यात तह झाला. याचा अर्थ असा की, १२ ऑक्टोबर १८०० या दिवसापासून हैदराबादचे स्वातंत्र्य नष्ट झाले. झालेला हा प्रकार कित्येकांना आवडला नाही. त्यात खुद्द निजामअलीचा मुलगा सिकंदरजहा, सरदार महिपतराम इत्यादींचा समावेश होता. त्यांनी इंग्रजाविरूध्द अनेक बंडे उठवली.

इ.स.१८०० पासून इ.स.१९४८ पर्यंत इंग्रज आणि निजाम यांच्याविरूध्द अनेक सशस्त्र बंड झाली. तीत इ.स.१८५७ मधील घटना अत्यंत महत्वपूर्ण होत्या. इ.स.१८८३ नंतर निजामाच्या विरूध्द सनदशीर चळवळीचा प्रार्दुभाव झाला. इ.स.१८९२ मध्ये आर्य समाजाची स्थापना, इ.स.१९०५ मधील स्वदेशी चळवळ, इ.स.१९१० मधील दहशतवाद्यांची कारस्थाने, इ.स.१९२१ मध्ये आंध्र महासभा व स्टेट रिफॉर्मस असोसिएशनची स्थापना, इ.स.१९३८ मधील काँग्रेस - आर्य समाज - हिंदुमहासभा यांचा सत्याग्रह, इ.स.१९३८ ते इ.स.१९४३ या कालखंडातील इत्तिहादुल मुसलमीनचे लढाऊ राजकारण त्यानंतरच्या काळातील काँग्रेसची चळवळ आणि इ.स.१९४८ चे पोलीस ॲक्शन असे हैदराबाद राज्यांतील स्वातंत्र्याच्या चळवळीचे महत्वाचे टप्पे होत.[३]

इ.स.१८०० पर्यंत येथील राजकारणात आणि सामाजिक जीवनात महाराष्ट्रीयांचे स्थान टिकून होते. महाराष्ट्रातून हैद्राबादकडे आणि

हैदराबादकडून महाराष्ट्राकडे लोकांची सारखी ये-जा होत होती. त्यामुळे तत्कालीन महाराष्ट्रीयांत एक प्रकारचा जिवंतपणा होता हे निश्चित. इ.स.१८०० च्या नंतर ही स्थिती पालटली. मराठेशाहीचा अस्त झाल्यावर महाराष्ट्रातील राजवट ही भिन्न वळणावर गेली. त्याबरोबरच मराठवाडा आणि महाराष्ट्र यांचे संबंध दुरावले. परचक्राची भिती नाहीशी झाल्यामुळे निजामाला महाराष्ट्रीय समाजाला संतुष्ट ठेवणे किंवा त्यांची आर्जव करणे याची गरज राहिली नाही. त्यामुळे इ.स. १८०० पासून इ.स.१८७० पर्यंतच्या काळात मराठवाड्यातील सार्वजनिक जीवन संकुचित आणि खुरटे बनले. सरदारांची आणि मुत्सद्द्यांची घराणी केवळ निष्प्रभ अशी बनली. काही देशमुख - देशपांडे यांची नांवे सोडल्यास या कालखंडात प्रमुख मराठ्यांची नावे ऐकू येत नाहीत.

इ.स.१९५६ च्या फेब्रुवारी महिन्यांत गृहखात्यामधून सेतुमाधवरावांची बदली शिक्षण खात्याकडे झाली. त्यावेळी भारत सरकारने स्वातंत्र्याच्या चळवळीचा इतिहास लिहिला जावा म्हणून एक योजना तयार केली. प्रत्येक राज्यांत या कामासाठी समित्या नेमण्यात आल्या. स्वातंत्र्ययुध्दाच्या इतिहासाची साधने एकत्र आणून ती प्रसिध्द करण्याचे काम या समित्यांकडे देण्यात आले. शिक्षण खात्याचे संचालक असताना पगडींच्याकडे हे काम देण्यात आले.[४]

भारतीय स्वातंत्र्ययुध्दांतील अनेक महत्वाच्या घटनांचे पडसाद आणि धागेदोरे हैदराबाद राज्यांत आढळतात. सेतुमाधवराव पगडी यांच्या मते, हैदराबाद राज्यातील स्वातंत्र्याच्या चळवळीची सुरूवात निजामाचे स्वातंत्र्य नष्ट झाले तेव्हापासून झाली. १२ ऑक्टोबर, १८०० रोजी निजाम आणि ईस्ट इंडिया यांच्यात तह झाला, या तहान्वये निजामाच्या संरक्षणाकरिता इंग्रजांची

फौज सिकंदराबादेस कायमची झाली. निजामाने हिंदुस्थानातील कोणत्याही राजेरजवाड्यांबरोबर कसलाही संबंध ठेवणार नाही, असे कबूल केले. इंग्रजांनी निजामाचे परचक्रापासून आणि राज्यांतील बंडखोरांपासून संरक्षण करण्याची जबाबदारी पत्करली. निजामाच्या नावाने पण त्याच्याच खर्चाने इंग्रज अधिकाऱ्यांच्या देखरेखेखाली आणि रेसिडेंटच्या पूर्ण ताब्यात असलेली फौज तयार केली. हीच ती कॉंटिनजेन्ट फौज होय. या सैन्यावर निजामाचा ताबा नाममात्र होता. या सैन्याच्या मदतीने इंग्रजांनी निजामाच्या राज्यातील सगळी बंडे मोडून काढली.[५] या फौजेची रक्कम वाढत जावून त्यापायी इ.स.१८५३ मध्ये निजामाला वऱ्हाड गमवावा लागला. इ.स.१८५३ पासून वऱ्हाडवरचा निजामाचा ताबा सुटला. त्यामुळे त्या भागाची विलक्षण प्रगती झाली. वऱ्हाड ( सतरा हजार चौरस मैल ) आणि मराठवाडा ( सव्वीस हजार चौरस मैल) अशा त्रेचाळीस हजार चौरस मैल म्हणजे महाराष्ट्राच्या एक तृतीयांश भागावर निजामाची सत्ता होती. ती आता मराठवाड्यापुरती म्हणजे महाराष्ट्राच्या एक पंचमांश भागापुरती मर्यादित राहिली.[६]

## इ.स.१८५७ पूर्वीची बंडे

औरंगाबाद येथील भिल्लाचे बंड (इ.स.१८२७), नांदेड जिल्ह्यातील हटकरांचे बंड (इ.स.१७९८ ते इ.स.१८२०), बीदर आणि निजामाबाद जिल्ह्यातील देशमुखांची बंडे (इ.स.१८२०), सिरूंचा व महादेवपूर येथील जमीनदारांचे बंड(इ.स.१८२०), रायचूर जिल्ह्यातील वरिप्पांचे

बंड(इ.स.१८२९) व कोहरान अरब आणि नरसिंगरावाची उठावणी अशी अनेक बंडे या काळात निजामाच्या राज्यात उद्भवली.

भारतीय राजकारणाचा प्रभाव हैदराबादच्या जनतेवर पडत होता. त्याबरोबरच हैदराबादेतील पुढारी भारतीय राजकारणात यथाशक्ती भाग घेत होते. सरोजनी नायडू, केशवराव कोरटकर, विनायकराव कोरटकर इत्यादी नेत्यांचा भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभाग होता.

इ.स. १८५७ च्या पूर्वीचा काळ, इ.स.१८५७ च्या क्रांतीयुध्दाचा काल, इ.स.१८५७ ते १८९६ पर्यंतचा आणि इ.स.१८९६ नंतर झालेल्या दहशतवादी सशस्त्र युध्दाचा काल, या चारही कालखंडात हैदराबाद राज्यांतील प्रजेने हिरीरीने भाग घेतला. एवढेच नव्हे तर शेजारच्या इंग्रजी मुलखांत झालेल्या सशस्त्र क्रांतीस आणि क्रांतीकारकास भरीव सहाय्य देणारे एक महत्वाचे केंद्र म्हणून इतिहासकारांना हैदराबाद राज्याचा उल्लेख करावा लागतो.

## १९व्या शतकाचा पूर्वार्ध

एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या ५० वर्षात झालेली ही बंडे म्हणजे हैदराबादच्या तत्कालीन राज्यकारभाराविरूध्द करण्यात आलेल्या सशस्त्र चळवळीच होत. त्याचे तपशील खालीलप्रमाणे:

१) इ.स.१८१८ -धर्माजी प्रतापरावांचे बंड- बीड जिल्ह्यात उद्भवले.

२) ११ ऑक्टोबर १८१८ रोजी अंबड (औरंगाबाद जिल्हा) येथे बंड उद्भवले.

३) हटकर जमातीचा पुढारी नौसाजी नाईक याचे बंड

४) वीरप्पा नावाच्या जमीनदाराचे बंड

५) इ.स.१८२० मध्ये उद्गीर येथे शिवलिंगय्या देशमुख याचे बंड

६) इ.स.१८२१ मध्ये कुशनापूरचा देशमुख तिरमलराव याचे बंड

७) निजामाबाद जिल्ह्यात भवानी पेठ येथे लक्ष्मणरेड्डी देसाई याचे बंड

८) इ.स.१८८२ मध्ये बंडखोरांनी माहूरचा किल्ला ताब्यात घेतला.

९) इ.स.१८८२ पासून जवळजवळ चाळीस वर्षेपर्यंत औरंगाबाद जिल्ह्यातील भिल्लांची बंडे चालू होती.

१०) इ.स.१८८२ मध्ये महादेवपूरच्या जमीनदारांने बंड केले. (महादेवपूर हे करीमनगर जिल्ह्यात मंथनी तालुक्यात आहे.)

११) इ.स. १८३० मध्ये परभणी जिल्ह्यात राजारामने बंड केले.

१२) इ.स.१८३२ मध्ये लातूरचे देशमुख व शिरढोणचे देशपांडे यांनी बंड केले.

१३) इ.स.१८४१ मधील रायचूर जिल्ह्यातील बंड

१४) इ.स.१८४२, १८४७ आणि १८५५ मध्ये नांदेड जिल्ह्यात सावरगांव, कंधार आणि देगलूर या ठिकाणी बंडे उद्भवली.

१५) इ.स.१८४९ मध्ये भद्राचलमच्या जमीनदाराने बंड केले.

१६) इ.स.१८५२ मध्ये बीदर जिल्ह्यात लिंगप्पाने बंड उभारले.

१७) इ.स.१८५२ मध्ये परभणी जिल्ह्यात नांदापूरच्या देशमुख कृष्णाजी याने बंड केले.

१८) इ.स.१८५२ मध्ये नरसिंगाने बंड करून बल्लेगांवचा किल्ला बळकावला.

१९) इ.स.१८५५ मध्ये रायचूर जिल्ह्यात दाणेदूर्ग येथे बेडर लोकांनी बंड केले.

२०) इ.स.१८५५ ला परभणी जिल्ह्यात बंड झाले.

ही बंडे मोडण्यासाठी कॉंटिनजेंट फौजेला बराच त्रास सोसावा लागला. कॉन्टिनजेन्ट फौजेच्या खर्चाबद्दल निजामाला वऱ्हाड, उस्मानाबाद व रायचूर हे प्रांत इंग्रजांकडे गहाण ठेवावे लागले. ही बंडे का उद्‌भवली याची कारणमीमांसा सेतुमाधवराव पगडींनी केली आहे ते म्हणतात,

''हैदराबाद सरकारची दुर्बळ स्थिती, अधिकाऱ्यांचा जुलूम आणि हैदराबाद दरबारातील गोंधळ यामुळे ही अनेक बंडे उद्‌भवली. हैदराबाद सरकारच्या नांवावर कॉंटिनजेंटच्या फौजांनी सतत ४० वर्षेपर्यंत ही बंडे मोडण्याचे काम केले नसते तर हे राज्य टिकले असते किंवा नाही याची शंकाच आहे. राज्यात सुधारणा करण्याकडे निजाम किंवा त्याचा प्रधान यास भाग पाडावयाचे नाही पण त्यांच्याविरूध्द उद्‌भवलेली बंडे मात्र मोडावयाची हेच काम १८५७ पर्यंत इंग्रजांनी केले. तैनाती फौजेचा तह इ.स. १८०० मध्ये झाल्यापासून १८५७ पर्यंत हैदराबाद राज्याच्या निरनिराळ्या भागांत झालेली ही बंडे म्हणजे हैदराबादेतील स्वातंत्र्याच्या चळवळीचे एक तेजस्वी स्वरूपच होते.''[७]

## इ.स.१८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामातील काही घटना

इ.स.१८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामातील काही घटना मराठवाड्यात घडल्या. इ.स.१८५७ मध्ये हिंदुस्थानातील इतर भागाप्रमाणे हैदराबाद राज्यातही इंग्रजाविरूध्द अनेक चकमकी झाल्या. त्यात औरंगाबाद येथील शिपायांचे बंड, हैदराबादेत रेसीडेन्सीवरील हल्ला, सुरापूरचा राजा व्यंकटप्पा नाईक याने इंग्रजाविरूध्द केलेला लढा, रंगराव नरखेडकरांचे कारस्थान,

भीमराव देसाईचा·कोप्पळवरील हल्ला अशा अनेक घटना घडल्या.

इ.स.१८५७ च्या उठावाचे औरंगाबाद हे दक्षिणेतील एक महत्वाचे केंद्र होते. विसाव्या शतकात औरंगाबाद हे चळवळीचे मोठे केंद्र बनले. अनंत कान्हेरे याचे जॅक्सन खुनाचे कारस्थान प्रथम औरंगाबादेत शिजले. औरंगाबाद म्हणजे ''मराठवाडयाची मनोरमाच'' होय.अशा या शहरात सेतुमाधवरावांना एक वर्षभर काम करण्यास मिळाले हे ते आपले भाग्यच समजतात.

वरील घटनांमध्ये औरंगाबादचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. हैदराबादच्या स्वातंत्र्ययुध्दाला पहिले तोंड औरंगाबाद येथेच लागले.

इ.स.१८५७-५८ मध्ये हैदराबाद राज्यातील बहुतेक जिल्हे अक्षरश: पेटले होते. या सुमारासच उत्तर हिंदुस्थानातून बरेच शिपाई आणि रोहिले व इतर जातीचे लोक दक्षिणेत पसरले आणि स्थानिक लोकांशी मिसळून उठावण्या करण्याचे त्यांनी प्रयत्न केले. नानासाहेब पेशव्यांचे हस्तक या उठावण्यांच्यामागे होते ही माहिती बाहेर पडू लागली.

इ.स.१८५७च्या स्वातंत्र्य संग्रामात हैदराबादचा दिवाण सालरजंग याने इंग्रजांचा पक्ष घेतला असे असूनही हैदराबाद आणि औरंगाबाद या शहरात बंडे झाली. सुरापूरचा वेंकटप्पा नाईक याने बंड केले ते मोडून काढण्यात आले. तोच प्रकार कोप्पळच्या भीमराव देसाईंच्याबाबतीत झाला. नानासाहेब पेशव्यांचा हस्तक बीडचा रंगराव रत्नाकर पागे नरखेडकर हा बंडास चिथावणी देण्याच्या आरोपावरून पकडला गेला. त्याला काळे पाण्याची शिक्षा झाली. तेथेच

त्याचा इ.स.१८६० मध्ये अंत झाला. पेशव्यांचा आणखी एक हस्तक रावसाहेब याने हैदराबादेस उठाव करण्याचा प्रयत्न केला. त्यात चाळीस माणसे पकडण्यात आली. रावसाहेबाला आश्रय देणारा रामरतनगीर गोसावी याने पोटात सुरा खूपसून घेऊन आत्महत्या केली. [८]

मराठवाड्यात बीड जिल्ह्यातही १८५७ मध्ये बंड झाले.शंकर आत्माराम, तात्या मुद्गल, बाळाजी गोसावी व दाजी खर्डेकर यानी बंड करून खर्ड्याची गढी हस्तगत करण्याचे कारस्थान केले. हे बंड मोडण्यात येऊन संबंधिताना कडक शिक्षा ठोठावण्यात आल्या.

हैदराबाद राज्यांत चाललेल्या या इ.स. १८५७-१८५८ या काळातील स्वातंत्र्य युध्दांत खालील लोकांनी विशेष कामगिरी करून मर्दुमकी गाजविली.

१) १७ जुलै, १८५७ रोजी हैदराबाद येथे रेसिडेंटच्या कोठीवर चाल करून जाणारे तुर्रेबाजखान व मौलवी अल्लाउद्दीन

२) कोप्पळचा किल्ला जिंकून घेऊन काँटिनजेंट फौजेने त्यावर हल्ला केला असता त्यांच्याशी लढताना मारला गेलेला भीमराव देसाई ( जून १८५८)

३) इंग्रजी फौजेशी लढणारा सुरापूरचा व्यंकटप्पा नाईक(७ व ८फेब्रु. १८५८)

४) नानासाहेब पेशव्यांना पत्र लिहून दक्षिणची व्यवस्था करण्यास सांगणारा सोनाजीपंत दप्तरदार

५) नानासाहेबांची पत्रे आणून नांदेड, बीदर विभागांत फौज गोळा करण्याचा प्रयत्न करणारा रंगराव पागे नरखेडकर

६) भिल्लांचा जमाव करून काँटिन्जेंट फौजेशी टक्कर घेणारा गोविंदराज

काशीराज देशपांडे वैजापूरकर

७) फौजेची जमवाजमव करणारा कौलासचा रजपूत जमीनदार दीपसिंह

८) त्याला सामील होणारा मुसलमान सरदार सब्दर उद्दौला

९) औरंगाबाद छावणीतून फुटून निघून सैन्याची जमवाजमव करून ठिकठिकाणी कॉटिन्जेंट फौजेशी लढणारा गुलाबखान

१०) आदिलाबाद जिल्ह्यात सैन्याची जमवाजमव करून लढाई देणारा रामजी गोंड.

वरीलपैकी कित्येक जण मारले गेले किंवा त्यांचा वध करण्यात आला. कित्येकांना आजन्म कारावास मिळाला. स्वतंत्र भारतांत त्यांची आठवण १८५८ च्या स्वातंत्र्ययुध्दांत पडलेले वीराग्रणी म्हणूनच सदैव राहील.

सरकारविरूध्द बंड करण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून बीडमधील खालील मंडळींवर इ.स. १८५८ साली खटला भरण्यांत आला.

१) नारायणराव, रामराव तालुकदार बीड यांचे कामगार २) शंकर आत्माराम ३) सय्यद चांद ४) सय्यद रसूद रोहिला ५) गुलाम नबी उर्फपापामियां ६) वामनराव विठ्ठल ७) त्र्यंबकराव उर्फ दाजी खर्डेकर ८) छोटू वारिक ९) लालासिंग १०) हरिजयराम ११) जानू अजीमोद्दीन मोमीन १२) श्रीनिवास शंकरराव १३) विठ्ठलराव उर्फ अंबाजी १४) माधवराव किशन १५) वामनराव किशन १६) गणू आत्माराम १७) एकनाथ गोविंद [९]

या खटल्याचा निकाल १८५९ मध्ये लावण्यात आला. या खटल्याचा कोर्टाचा निर्णय असा होता.

शंकर आत्माराम, तात्या मुद्गल, बाळाजी गोसावी व दाजी

खर्डेकर यांनी बंड करून खर्ड्याची गढी हस्तगत करण्याचे कारस्थान केले होते. फौज गोळा करून बंड करण्याचा त्यांचा विचार होता. सय्यद चांदला त्यांनी आपल्याकडे वळवून घेतले आणि फौजेची तयारी व पगार याचा कागद लिहिला. बाजूरी शिलेदार व राठोडांच्याकडे जाऊन शिपायांना नेमण्यासंबंधी खटपट केली. दारू गोळ्यासंबंधी व्यंकणभट ज्योतिषाच्या मार्फतीने त्या लोकांना कांही रकमा देण्यात आल्या व काही प्रमाणात दारूगोळा तयार करण्यात आला. शंकर आत्माराम, तात्या मुद्गल, दाजी खर्डेकर व बाळाजी गोसावी हे या कारस्थानात मुख्य होते. गुलाम नबीखान उर्फ पापामियां याला त्यांनी आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न केला व फौज गोळा करण्याची खटपट केली पण रक्कम हाती नसल्यामुळे त्यांची इच्छा पूर्ण झाली नाही. म्हणून हुकूम देण्यात येतो की: ' शंकर आत्माराम, दाजी खर्डेकर व शेखचांद यांना ७ वर्षाची शिक्षा देण्यात येते. यांना पायांत बेड्या घालून ठेवण्यात यावे. वामन विठ्ठलराव, लालासिंग व छोटू वारीक हे शंकर आत्मारामच्या कारस्थानात होते व त्यांनी सरकारला त्याची हकिकत कळवली नाही याकरिता त्यांना २ वर्षाची कैद फर्माविण्यात येते. त्यांनाही पायांत बेड्या घालून ठेवण्यात यावे. माधवराव, वामनराव, एकनाथ गोविंद, श्रीनिवासराव, विठ्ठलराव देशमुख, हरि जयराम, जानू अजिमोद्दीन, गणू आत्माराम आणि नारायणराव मुत्सद्दी यांच्यावर कारस्थानात सामील असल्याचे सिध्द झाले नाही म्हणून त्याना सोडून देण्यात येते. गुलामनबी उर्फ पापामियांने जरी शंकर आत्मारामची नोकरी कबूल केली नाही तरी त्याने कारस्थानाची हकिकत आपले वडील मुस्तफाखान जिल्हाधिकारी अगर सरकार यांना कळविली नाही म्हणून त्याला एक वर्षाची कैदेची शिक्षा देण्यात येते. सय्यद रसूल संबंधी कारस्थानात

भाग घेतल्याचा पुरावा नाही तरी पण त्याला इतक्यात सोडून देणे इष्ट नाही. आरोपींना बीड येथे तारीख ८ मार्च, १८५९ रोजी पकडण्यात आले त्या दिवसापासून शिक्षेचा अम्मल समजला जाईल.'[१०]

१८५८ च्या स्वातंत्र्ययुध्दांत सर्व लोकांत असंतोषाचा वन्हि भडकला होता. त्याचे प्रत्यंतर अनेक लहान मोठ्या कारस्थानावरून दिसून येते. त्यापैकी वरील खटला एक होय.

मराठवाडा हे नांव इ.स.१८६४ पासून रूढ झाले. महाराष्ट्रातील चळवळीचे लोण हळूहळू हैदराबाद राज्यांत पसरू लागले. हैदराबाद ते बेझवाडा रेल्वेमार्ग बांधण्यासाठी हैदराबाद सरकार इंग्रज कंपन्यांशी बोलणी करीत होते. ही बोलणी कोणत्या अटींवर होतात हे जाहीर करावे अशी सरकारला मागणी केली यात सरोजनी नायडू यांचे वडील डॉ.अघोरनाथ चट्टोपाध्याय यांना हद्दपार करण्यांत आले. हैदराबाद जनतेची चळवळ त्या दिवशी सुरू झाली असे पगडींना वाटते. [११]

इ.स.१८६७ मध्ये रामराव उर्फ जंगबहादूर याने बीदर जिल्ह्यात जमाव करून बंड करण्याचा प्रयत्न केला. त्यात त्याला अटक करून काळे पाण्यास पाठविण्यात आले. हा रामराव उर्फ जंगबहादूर स्वत:ला सातारकर छत्रपतींचा वारस म्हणवून सातारचे राज्य परत घेण्याकरीता कारस्थान करीत होता हे उघडकीस आले. [१२]

मराठवाड्याच्या इतिहासात इ.स.१८७० पासून नवीन कालखंडाला सुरूवात होते. हैदराबादचे तत्कालीन पंतप्रधान पहिले सालारजंग यांच्या प्रयत्नांमुळे राज्यकारभारांत आमूलाग्र सुधारणा होऊ लागल्या. मुंबई आणि

हैदराबाद रेल्वेमार्ग निर्माण झाल्यामुळे इ.स.१८०० ते इ.स.१८७० मध्ये तुटलेला महाराष्ट्र आणि मराठवाडा यातील दुवा पुन्हा सांधला गेला.[१३]

महाराष्ट्रातील अनेक क्रांतीकारकांनी हैदराबाद राज्यात येऊन महाराष्ट्रात उठाव करण्याचे प्रयत्न केले. इ.स.१८७९ मध्ये क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके याने हैदराबादेत उठाव करण्याचा प्रयत्न केला. हा सुप्रसिध्द क्रांतीवीर गुलबर्ग्याच्या परिसरात बरेच दिवस होता. गुलबर्गा विभागांतील जनतेने वासुदेव बळवंताना मोठ्या प्रमाणात सहानुभूती दाखवली होती.[१४] पण २१ जुलै १८७९ रोजी वासुदेव बळवंत यास हैदराबाद राज्याच्या सरहद्दीवर पकडण्यात आले. राज्यातील त्याचे साथीदार, इस्माईलखान रोहिला, छत्रू नाईक, रामचंद्र विश्वामित्र इत्यादींना कडक शिक्षा ठोठावण्यात आल्या.

''हैदराबाद राज्य आणि महाराष्ट्र यांच्या सरहद्दी अगदी लागून असल्यामुळे महाराष्ट्रात झालेल्या प्रत्येक स्वातंत्र्यविषयक चळवळीचे प्रतिध्वनी हैदराबाद राज्यात उमटले. चाफेकर बंधूच्या संबंधाने उपलब्ध झालेले कागदपत्र पाहिले म्हणजे हैदराबादची जनता स्वातंत्र्य आंदोलनाशी कशी निगडीत होती याची कल्पना येते'' असे पगडी लिहितात.[१५]

यानंतर इ.स.१८८५ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसचा जन्म झाला. त्याला हैदराबादच्या अधिकाऱ्यांनी विरोध केला असला तरीसुध्दा डॉ.अघोरनाथ, मुल्ला अ.कय्युम, रामचंद्र पिल्ले, माहिबहुसेन इत्यादींनी काँग्रेसला त्या काळात पाठिंबा दिला होता.

इ.स.१८९२ मध्ये आर्य समाजाची स्थापना व इ.स.१८९४ मध्ये गणेश उत्सवाचा प्रारंभ या दोन घटना हैदराबाद येथील भावी चळवळीच्या

दृष्टीने महत्वाच्या होत्या.

इ.स.१८९९ मध्ये महाराष्ट्रातील एक इसम बाबासाहेब याने बीड जिल्ह्यात उठावणी केली. १४ एप्रिल १८९९ रोजी इंग्रजांच्या कॉंटिनजेंट दलाने बाबासाहेबाच्या टोळीवर हल्ला करून बरीच माणसे मारली आणि साठ-सत्तर लोकांना पकडले. बाबासाहेबांची उठावणी म्हणजे हैदराबाद राज्यात १९व्या शतकांत इंग्रजांच्याविरूध्द जी कारस्थाने झाली, त्यापैकी शेवटचे आणि महत्वाचे कारस्थान होय.

इ.स.१९०० पासून पुढील दोन शतकात काम करणाऱ्या प्रमुख पुढाऱ्यात केशवरावजी कोरटकर, वामन नाईक, श्रीपाद सातवळेकर, दत्तोपंत तुळजापूरकर आणि हणमंतराव माडपाटी यांची नांवे पुढे येतात.

२१ डिसेंबर,१९०९ रोजी नाशिकचे कलेक्टर मिस्टर जॅक्सन याचा खून झाला. हा खून औरंगाबाद येथील कला शाळेचा विद्यार्थी आणि नाशिक येथील क्रांतिकारकांच्या गुप्त मंडळाच्या औरंगाबाद शाखेचा सभासद अनंत लक्ष्मण कान्हेरे याने केला. या प्रकरणाची झळ अनेकांना लागली. विशेषत: शाळा खात्यांतील नोकर वर्ग, औरंगाबाद शाळेच्या विद्यार्थ्यावर कडक नजर ठेवण्यात आली. गुप्त मंडळाच्या शाखा हैदराबाद राज्यात कोठे आढळण्यात आल्या तर कडक उपाय योजण्यात यावेत असे आदेश सरकारी अधिकाऱ्यांना दिले.

जॅक्सन खुनामुळे हैदराबादच्या पश्चिम भागांत टिळकांनी सुरू केलेल्या राजकीय चळवळीचा आणि सावरकरांनी आखलेल्या क्रांतिकारी कार्यक्रमाचा किती प्रभाव पडू लागला होता हे दिसून येते. या प्रकारामुळे हैदराबाद सरकार अस्वस्थ झाले होते.

पहिल्या महायुध्दानंतर हैदराबादेतील चळवळीना जोर वाढू लागला. इ.स.१९२०-३० या कालात आंध्रसभा, कर्नाटक परिषद, महाराष्ट्र परिषद या सभा पुढे आल्या. हिंदु-महासभा, आर्य समाज यांनीही आपल्या कार्यास सुरूवात केली. इत्तेहादुल मुसलमीनची चळवळ ही याच सुमारास सुरू झाली. स्टेट कॉंग्रेसचा जन्म झाला. आर्य समाजाचा सत्याग्रह आणि नागरिक संघाचा सत्याग्रह यामुळे इ.स.१९३८ हे साल हैदराबादच्या इतिहासात क्रांतिकारी ठरले होते.

सेतुमाधवराव पगडी निजाम राज्यात परंडा येथे इ.स.१९३८ ते १९४० पर्यंत तहसिलदार म्हणून काम करीत असताना या काळातच हैदराबाद राज्यांत आर्य समाजाचा सत्याग्रह गाजला त्याचे पडसाद परंड्यात कसे उमटले, त्याचे विवेचन पगडींनी एके ठिकाणी केले आहे. ते लिहितात,

'' निजाम राज्याच्या इतिहासात इ.स.१९३८-३९ ची आर्य समाजाची प्रखर चळवळ म्हणजे जनजागृतीच्या दृष्टीने एक अतिशय महत्वाचा टप्पा होय. या चळवळीनंतर ज्नतेच्या मनावर गेल्या दीडशे वर्षापासून चालत आलेला भीतीचा पगडा नाहीसा झाला. जनतेचा आत्मविश्वास जागृत झाला. तिला अस्मिता प्राप्त झाली. सत्ताधारी जमातीची तिला भीती वाटेनाशी झाली. सारांश, आर्य समाजाच्या चळंवळीमुळे प्रथमच राज्याचे अधिकारी आपल्या भविष्याबद्दल साशंक होऊ लागले. आपली जमात मूठभर असली तरी आपण बहुसंख्य जनतेवर प्रभावीपणे सत्ता गाजवू असा जो आत्मविश्वास त्यांना वाटत होता तो ढळू लागला.'' [१६]

इ.स.१९४७ मध्ये हैदराबाद राज्यांत १५ ऑगस्ट रोजी

जनतेने सरकारच्या दडपशाहीला न जुमानता स्वातंत्र्यदिन उत्साहाने साजरा केला. याविरूध्द इत्तिहादुल मुसलमीन आणि रझाकार यांनी स्वतंत्र हैदराबादची घोषणा केली.

## हैदराबाद पोलीस ॲक्शन

दि.१५ ऑगस्ट, १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर भारतातील विविध संस्थानांच्या विलीनिकरणाचा प्रश्न निर्माण झाला. हैदराबादच्या निजामाला व काही मुसलमानांना भारतात विलीन होणे मान्य नव्हते. भारतात सामील होणेबाबत निजामावर भारत सरकारचा दबाव वाढत होता. दरम्यानच्या काळात हैदराबाद संस्थानात हैदराबाद मुक्तीसंग्रामाने बराच जोर धरला होता. भारत सरकारच्या दबावाला विरोध करण्यासाठी त्याचबरोबर दहशतीच्या मार्गाने हैदराबाद मुक्ती संग्राम हाणून पाडण्यासाठी कासीम रझवीच्या नेतृत्वाखाली मुसलमानांनी सशस्त्र रझाकार चळवळ जोमाने सुरू केली. रझाकारांच्या अत्याचाराला कंटाळून आपले प्राण वाचविण्यासाठी लाखोच्या संख्येने हिंदू लोक शेजारच्या प्रांतात आश्रयासाठी जावू लागले. बहुसंख्य हिंदू अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या कुटुंबियाचे स्थलांतर परप्रांतात केले. पगडींनी मात्र हैदराबाद शहर सोडले नाही.

'पोलीस ॲक्शन' च्या काळात हैदराबाद शहरातील वातावरण अतिशय संतप्त झाले होते. प्रत्येक कार्यालयातील मुसलमान अधिकारी व सामान्य कर्मचारी स्वत: शस्त्रे बाळगत होते. अशावेळी हिंदू अधिकारी व

कर्मचाऱ्यांना दहशतीखाली कामे करावी लागत होती. अर्थात हा अत्याचार जास्त काळ टिकला नाही व भारत सरकारचे पोलीस ॲक्शन यशस्वी होऊन दि. १७ सप्टेंबर,१९४८ रोजी हैदराबाद निजामाने शरणागती पत्करली आणि हैदराबाद संस्थान भारताच्या संघराज्यात विलीन करण्यात आले.

दि. १७ सप्टेंबर, १९४८ या पोलीस ॲक्शनच्या दिवसाचे वर्णन करतांना सेतुमाधवराव पगडी म्हणतात,

"त्या दिवशी हैदराबाद शहरातील वातावरण अतिशय तप्त व साशंक होते. चिडलेले रझाकार शहरातील सर्रास हिंदूंची कत्तल करतील की काय या भीतीने शहरातील सर्व हिंदू अतिशय चिंतीत होवून आपआपल्या घरात स्वत:ला कोंडून घेवून बसले होते. तो अनंत चतुर्दशीचा दिवस होता, त्यामुळे प्रत्येक हिंदूच्या घरी गोडधोड झाले होते. पण कोणाचा घास नरड्याखाली उतरत नव्हता. संध्याकाळी निजामाने शरणागतीची घोषणा केली व स्वामी रामानंद तीर्थांनी जनतेला शांत राहण्याचे आवाहन केले.उत्सुकता म्हणून मी घराबाहेर पडलो, बाहेचे सगळे वातावरण एकदम बदलून गेले होते. सडकेवर दोन तीन मैलापर्यंत लाखो माणसे एकत्र आली होती. एकमेकांवर गुलाल उधळत होती. माणसे एकमेकांना कवटाळून हसत होती. नाचत होती. जेथे पहावे तेथे माणसेच माणसे दिसत होती, त्यात आम्हीही मिसळलो. आनंदाने नाचत सुटलो. हर्षाने बेभान होऊन गेलो."[१७]

पोलीस ॲक्शननंतर हैदराबाद राज्याची सूत्रे लष्कराच्या हाती देण्यात आली. जनरल चौधरी यांनी हैदराबादच्या प्रशासकीय कारभाराची सूत्रे ताब्यात घेतली. असंख्य मुसलमान अधिकारी, मंत्री व महत्वाच्या व्यक्तींनी

हैदराबादहून पलायन केले व पाकिस्तानात आश्रय घेतला. रझाकार चळवळींशी संबंधित असणाऱ्यांच्या विरोधात लष्करी कार्यवाही सुरू झाली.

निजाम राजवटीत हिंदूंची हेटाळणी करणारे मुसलमान अधिकारी व कर्मचारी स्वत:ची नोकरी वाचविण्यासाठी रझाकार चळवळींशी आपला कसलाही संबंध नसल्याचे पटवून देण्यासाठी नको त्या तर्कवितर्कांचा आधार घेऊ लागले. हे पाहून पगडींना मानवी स्वभावाचे व त्यांच्या विचित्रपणाचे नवल वाटले. ते लिहितात.

" मानवी मन खरोखरीच अतर्क्य आहे. आपण रझाकारी मनोवृत्तीचे नव्हतो हे दाखविण्याची या लोकांची केविलवाणी धडपड मला मोठी उद्‌बोधक वाटली. पेशवाई गेली, मोगल साम्राज्य गेले, त्यावेळी एकेकाळचा समृध्द व संपन्न देश एकदम खालावला. मोठमोठी घराणी लयाला गेली. या गोष्टी मी इतिहासातून वाचल्या होत्या. पण निजामी राजवटीची उचलबांगडी मी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिली. सगळे दिवस सारखे नसतात. अधिकार दोन दिवसांचा त्याच्या जोरावर कोणी कोणाला तुच्छ लेखू नये. हे मी या काळात शिकलो. खालावलेल्या परिस्थितीत माझे जुने अधिकारी मित्र दिसले की, सौजन्य, शिष्टाचार, सहानुभूती मी कसोशीने दाखवित असे. जगात कोणी कोणाला तुच्छ लेखू नये हेच खरे."[१८]

## उबेदुल्लाची कामगिरी

परदेशामध्ये जावून अनेक भारतीयांनी स्वातंत्र्य चळवळीसाठी प्रयत्न केले. इंग्रजांचे राज्य उलथून टाकण्यासाठी प्रयत्न केले.

पदभ्रमंती करून स्वातंत्र्याचा विचार इतर देशात मांडून, त्या देशांच्या शासनव्यवस्थेचा अभ्यास करून भारताच्या स्वातंत्र्याची कल्पना मांडण्याचा प्रयत्न उबेदुल्ला नावाच्या भारतीयाने केला. भारतीय शासन भारतीयांनीच चालविले पाहिजे. यासाठी हंगामी सरकारची संकल्पना उबेदुल्लाने मांडली. स्वातंत्र्यासाठी ज्या थोर क्रांतिकारकांनी अविरत प्रयत्न केले त्यामध्ये उबेदुल्लाचे स्वातंत्र्यासाठीचे कार्य महत्वाचे आहे. याचे विवेचन करण्याचे काम सेतुमाधवराव पगडींनी केले.

उबेदुल्ला सिंधी याचा जन्म १० मार्च,१८७२ रोजी पंजाबमधील सियालकोट जिल्ह्यात झाला. उबेदुल्ला मूळचा शीख, पण त्याने इस्लाम धर्माचा स्वीकार केला. उबेदुल्लाचे शिक्षण देवबंद येथील धर्मविद्यापीठात झाले. त्यावेळी देवबंद - धर्मपीठाचा आचार्य महमूद हसन हा होता. भारतीय मुसलमानांत तो अत्यंत विद्वान म्हणून ओळखला जात असे.

महमूद हुसेनच्या सल्ल्याने उबेदुल्ला अफगाणिस्तानात गेला. इ.स. १९१५ मध्ये तो काबूलला पोहोचला. त्याने आणि त्याच्या सहकाऱ्यांनी सात वर्षे तेथे राहून अनेक कारस्थाने केली. तुर्क आणि जर्मन यांनी एक लष्करी शिष्टमंडळ अफगाणिस्तानात पाठविले होते. या शिष्टमंडळाबरोबर राजा महेंद्रप्रताप हे आले होते.

अफगाणिस्तानातील कारस्थानासंबंधी रौलेट कमिटीच्या रिपोर्टात खालील मजकूर आहे. त्यावरून उबेदुल्लाच्या चळवळीवर चांगलाच प्रकाश पडतो.

''ऑगस्ट १९१६ मध्ये रेशमाच्या कपड्यावर लिहिलेल्या पत्रांची घटना उघडकीस आली आणि सरकारला या कारस्थानाचा सुगावा लागला.

या कारस्थानाचा हेतू हा होता की, एकीकडे वायव्य सरहद्दीवर गडबड उडवून द्यायची आणि दुसरीकडे भारतीय मुसलमानांनी चळवळीच्याद्वारे वरील दंगलींना पाठिंबा देऊन इंग्रजांचे राज्य संपुष्टात आणावयाचे. ही योजना पार पाडण्यासाठी उबेदुल्ला नावाचा मनुष्य आपले तीन सहकारी अब्दुल्ला, फतेमहंमद आणि महंमद अली यांना बरोबर घेऊन ऑगस्ट, १९१५ मध्ये वायव्य प्रांताची सरहद्द ओलांडून गेला. देवबंद येथे असताना उबेदुल्लाने इंग्रज विरोधाचे आणि बंडखोरीचे विष विद्यापीठातील काही प्राध्यापक आणि विद्यार्थी यांत पसरविले. त्यातील प्रमुख म्हणजे देवबंदचा मुख्याध्यापक महमूद हसन हा होय.''

महमूद हसन आणि उबेदुल्ला यांचा बेत असा होता की, एकीकडून हिंदुस्थानवर बाहेरून हल्ले करावे आणि दुसरीकडून भारतीय मुसलमानांकडून बंड करवावे.

इंग्रजांचे राज्य नाहीसे झाल्यावर हंगामी सरकार स्थापन करण्याची एक योजना उबेदुल्ला आणि त्याचे सहकारी यांनी तयार केली.

या हंगामी सरकारचे अध्यक्षपद महेंद्रप्रताप यास दिले. महेंद्रप्रताप हा एका प्रतिष्ठित घराण्याचा उत्साही हिंदू होता.

स्वत: उबेदुल्ला याने हिंदूस्तानचा वजीर व्हावे आणि बरकतुल्ला याने मुख्य प्रधान व्हावे असे ठरले होते. मौलाना बरकतुल्ला हा भोपाळ संस्थानच्या एका अधिकाऱ्याचा मुलगा होता. बरकतुल्ला हा श्यामजी कृष्ण वर्मा याचा मित्र असून, अमेरिकेच्या गदर पार्टीचा सभासद होता. टोकियो येथे तो हिंदुस्थानी भाषेचा प्राध्यापक होता. तेथे त्याने एक कडक नियतकालिक चालू केले. त्याचे नाव 'इस्लामिक फ्रॅटर्निटी' असे होते. जपान सरकारने ते

नियतकालिक बंद करून त्याला प्राध्यापकाच्या पदावरून बडतर्फ केले. यानंतर बरकतुल्ला हा अमेरिकेस जाऊन आपल्या गदर पार्टीस मिळाला. हंगामी सरकार (महेंद्र प्रताप, बरकतुल्ला इत्यादी)च्या मंडळींनी रशियन तुर्कस्थानचा गव्हर्नर आणि इतर यांना पत्रे पाठविली. रशियाने इंग्लंडची सोबत सोडून द्यावी आणि हिंदुस्थानातून इंग्रजांचे उच्चाटन करण्यात मदत करावी म्हणून विनंती केली.

तुर्क सरकारबरोबर संबंध प्रस्थापित करावे हा ही हंगामी सरकारचा उद्देश होता. तो पुरा व्हावा म्हणून उबेदुल्लाने महमूद हसनला एक पत्र लिहिले. हे पत्र उबेदुल्लाने हैदराबाद सिंध येथे शेख अब्दुररहीम ( आचार्य कृपलानी यांचा भाऊ) याच्याकडे पाठविले. या पत्रात जर्मन आणि तुर्क यांचे लष्करी शिष्टमंडळ अफगाणिस्तानात आले. त्यापैकी जर्मन सभासद परत गेले. तुर्क अफगाणिस्तानात निष्क्रीय होवून राहिले. हिंदुस्थानातून काही विद्यार्थी पळून अफगाणिस्तानात आले होते. गालिब पाशाने काढलेल्या जाहीरनाम्यात म्हटले आहे की, हंगामी सरकारने हिडबल्ला नावाचे सैन्य तयार करावे त्यात हिंदुस्थानातून रिक्रूट भरती करण्यात यावी. या कामाद्वारे इस्लामी राष्ट्रातून परस्पर स्नेहाचे संबंध निर्माण करणे हा उद्देश होता.

इ.स.१९१६ मध्ये महमद हसन आणि त्याचे चार साथीदार इंग्रजांच्या हाती सापडले.

उबेदुल्ला काबूलमध्ये सात वर्षे राहिला. अफगाणिस्तानचा अमीर हबीबुल्ला याने हिंदुस्थानवर स्वारी करावी आणि इंग्रजांविरूध्द युध्द पुकारावे अशी खटपट जर्मन, तुर्क आणि हिंदुस्थानातून गेलेली उबेदुल्लासारखी मंडळी करीत होती. पण त्यात त्याना यश आले नाही.

भारतातील मुसलमान जोपर्यंत भारतीय बनत नाहीत, तोपर्यंत भारतात किंवा बाहेरच्या इस्लामी जगात प्रतिष्ठा प्राप्त होणे अशक्य आहे. उबेदुल्ला इ.स.१९२२ मध्ये रशियात गेला. रशियन क्रांतीच्या घटनांचा त्याच्या मनावर परिणाम झाला. प्रचलित इस्लामी समाज आणि मुसलमान राज्ये किती संकुचित विचारांची आहेत आणि इस्लामची आद्य तत्वे अंमलात आणण्याचा प्रयत्न करणे किती आवश्यक आहे. हे त्याला दिसून आले.

रशियात एक वर्ष राहून उबेदुल्ला सिंधी तुर्कस्थानला आला तुर्कीत उबेदुल्ला साडेतीन वर्षे होता. तेथून इटली, स्वित्झर्लंड हे देश पाहून तो मक्केला आला. अरबस्थानात तो दहा बारा वर्षे होता. तेथे इब्न सौदची राजवट त्याने जवळून पाहिली.

७ मार्च,१९३९ रोजी तो कराचीला आला. त्याने तेथे येताच हिंदुस्थानातील कर्मठ संकुचित विचाराचे मुल्ला-मौलवी, धर्माचे नांव पुढे करून आपले ऐषाराम चालू ठेवणारे श्रीमंत आणि ऐदी लोक यांच्यावर कडाडून हल्ला चढविला. त्याने स्पष्ट सांगितले की, हा सध्याचा इस्लामी समाज आतून बाहेरून पोखरलेला आहे. उबेदुल्लाला कॉंग्रेसबद्दल सहानुभूती होती. तो फाळणीच्या विरूध्द होता. आपल्या कार्यक्रमात त्याने सामाजिक आणि आर्थिक क्रांतीवर भर दिला. धार्मिक बाबतीत तो अठराव्या सुप्रसिध्द भारतीय मुस्लीम धर्मशास्त्रज्ञ शहा वलीउल्ला (मृत्यू इ.स.१७६३) याचा भक्त होता.

२१ ऑगस्ट १९४४ रोजी भावलपूर संस्थानात दीनपूर या गावी उबेदुल्लाचा मृत्यू झाला. तेव्हा त्याचे वय ७२ वर्षाचे होते. [१९]

काश्मीरचा राजा हरिसिंग यांनी भारतात विलीन होण्याच्या

करारावर स्वाक्षरी केली. काश्मीरची जनता भारतात विलीन होण्यास उत्सुक होती. या कामी नॅशनल कॉन्फरन्सचे नेते शेख अब्दुला यांनी मोलाचे सहाय्य केले. आणखी एक महत्वाचे म्हणजे शेख अब्दुलांनी लिहिलेलं उर्दू भाषेतील आत्मवृत्त हे आधुनिक भारताच्या इतिहासाला उपयुक्त असणारं एक मौलिक साधन सामर्थ्य कसं आहे हे सेतुमाधवराव पगडींच्या लिखाणावरून लक्षात येते.

# संदर्भ व तळटीपा

१) पगडी सेतुमाधवरात्र, इतिहासाचा मागोवा, पृ.६८
२) कित्ता, पृ.६८
३) पगडी सेतुमाधवराव, हैदराबादेच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, पृ.५
४) पगडी सेतुमाधवराव, जीवनसेतु, पृ.५९१
५) हैदराबादेच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, पृ.७
६) जीवनसेतु, पृ.५९३
७) हैदराबादेच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, पृ.२६
८) कित्ता, पृ.८
९) कित्ता, पृ.६२
१०) कित्ता, पृ.७२
११) इतिहासाचा मागोवा, पृ.१४२
१२) हैदराबादेच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, पृ.८३
१३) जीवनसेतु, पृ.५७८
१४) हैदराबादेच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, पृ.९७
१५) कित्ता, पृ.९९
१६) पगडी सेतुमाधवराव, तन्वी-श्यामा, पृ.३३
१७) जीवनसेतु, पृ.५३१
१८) कित्ता, पृ.५४५
१९) इतिहासाचा मागोवा, पृ.१५५ ते १६७